# स्पेन पाचव्यांदा अंतिम फेरीत

## चार मिनिटांत दोन गोल झळकावत उपांत्य सामन्यात फ्रान्सवर २-१ ने मात

**एपी, म्युनिक**



**स्पेनने युवा** गुणवत्तेच्या जोरावर युरो फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. स्पर्धेच्या उपांत्य सामन्यात स्पेनने फ्रान्सचा २-१ असा पराभव केला. पूर्वार्धात लामिन यमाल आणि डॅनी ओल्मो यांनी चार मिनिटांत केलेले दोन गोल निर्णायक ठरले. सामन्यातील तीनही गोल सुरुवातीच्या २५ मिनिटांतच नोंदवले गेले.

लौकिकाला साजेशा अशा ‘टिका-टाका’ खेळाला उपांत्य फेरीत दिलेल्या खोलवर पासच्या जोडने स्पेनने फ्रान्सला निष्प्रभ केले. वेगवान सुरुवात आणि पहिला गोल करूनही फ्रान्सला त्याचा फायदा उठवता आला नाही. कर्णधार एम्बापेने संघासाठी पूर्ण झोकून देऊन खेळण्यासाठी मास्क न घालता सहभाग घेतला. पण, एम्बापे याही सामन्यात आपला प्रभाव दाखवू शकला नाही. दिशाहीन फटके मारून एम्बापेने चाहत्यांना निराश केले. चार मिनिटांत दोन गोल स्वीकारावे लागल्यानंतर फ्रान्सचे खेळाडू दडपणाखाली गेले. पूर्वार्धात त्यांनी थोडा तरी टिकाव धरला होता. पण उत्तरार्धात त्यांनी निराशा केली. फ्रान्सची निराशा त्यांच्या खेळातून दिसत होती. उत्तरार्धात फ्रान्स खेळाडूंच्या पासमध्ये तेवढी अचूकताही नव्हती आणि खेळात आत्मविश्वासही दिसून आला नाही. ग्रिझमन, डेम्बेले यांचे उत्तरार्धातील काही प्रयत्न वगळता फ्रान्सला आपली क्षमता दाखवून देता आली नाही. पहिल्या गोलनंतर फ्रान्सच्या आक्रमकांना अभावानेच स्पेनचा बचाव भेदता आला आणि हाच या सामन्यातील सर्वांत मोठा निर्णायक क्षण ठरला.

सामन्याची सुरुवातच मुळात वेगवान झाली. वेगवान चाली आणि धारदार आक्रमणे खेळाच्या सुरुवातीपासूनच बघायला मिळाली. स्पेनने अपेक्षितपणे आक्रमक बचावपटू डॅनी कार्वाहालच्या जागी नवासला खेळवले. सामन्याच्या पाचव्याच मिनिटाला स्पेनच्या विल्यम्सचा क्रॉस रुईजच्या पुढ्यात पडला. फ्रान्सच्या खेळाडूंकडून रुईजला गृहीतच धरले नव्हते. पण, रुईजची किक गोलपोस्टवरून बाहेर गेली. त्यानंतर चार मिनिटांनी नवव्या मिनिटाला फ्रान्सने वेगवान आक्रमण केले. डाव्या बगलेतून गोलकक्षात शिरलेल्या एम्बापेकडून हवेतून आलेल्या क्रॉसवर रँडल कोलो मुआनीने जबरदस्त हेडर करत फ्रान्सला आघाडीवर नेले. एका गोलच्या पिछाडीनंतर स्पेनच्या खेळाडूंवर कुठलेही दडपण दिसत नव्हते. कमालीच्या संयमाने त्यांनी सामन्यात राहणे पसंत केले.

स्पेनने नेहमीच्या छोट्या-छोट्या पासच्या शैलीने आपले नियंत्रण राखले. छोट्या पासवर खेळतानाच मधूनच खोलवर पास देण्याची त्यांची रणनीती वेगळी ठरली. यमालने याचा फायदा उठवला. गोलकक्षाच्या बाहेर त्याने डाव्या पायात चेंडू चांगला खेळवला आणि रॅबिओला चकवून २५ मीटर अंतरावरून मारलेल्या किकने जाळीचा अचूक वेध घेतला. फ्रान्सचा गोलरक्षक मेन्यॉला चेंडू अडवण्याची उसंतही मिळाली नाही. यमालच्या २१व्या मिनिटाच्या गोलने स्पेनच्या आक्रमणाला अशी धार आली की, चारच मिनिटांनी नवासकडून मिळालेल्या पासवर गोलकक्षात ओल्मोने फ्रान्सच्या बचावपटूंना सुरेख चकवले आणि चेंडूला थेट जाळीची दिशा दिली. गोलरक्षक मागे राहिल्यामुळे कुंडे बचावासाठी पुढे आला. त्याच्या ताणलेल्या पायाने चेंडूला स्पर्श केला. पण, चेंडू आधीच गोलजाळीच्या दिशेने असल्यामुळे स्वयंगोल न देता गोल ओल्मोच्या नावावर निश्चित करण्यात आला.

## अर्जेंटिनाच्या विजयात मेसीची चमक



**ईस्ट रुदरफोर्ड :** तारांकित खेळाडू लिओनेल मेसीने केलेल्या गोलच्या जोरावर अर्जेंटिनाने कॅनडाचा २-० असा पराभव करून कोपा अमेरिका फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला.

उपांत्य सामन्याच्या २२व्या मिनिटाला ज्युलियन अल्वारेझने रॉड्रिगो डी पॉलकडून आलेल्या खोलवर पासवर अचूक नियंत्रण राखून कॅनडाच्या बचावपटूंना सुरेख चकवले आणि कॅनडाचा गोलरक्षक मॅक्सिम क्रेप्यूच्या पायातून अगदी अलगद चेंडू गोल जाळीत ढकलला. त्यानंतर मेसीने ५१व्या मिनिटाला एन्जो फर्नांडिसच्या पासवर चेंडूला गोलजाळीत ढकलत अर्जेंटिनाची आघाडी दुप्पट केली. मेसीचे आक्रमण थोपविण्यासाठी गोलरक्षक मॅक्सिम क्रेप्यू पुढे आला होता. पण, मेसीची किक त्याच्या आवाक्याबाहेरची ठरली. कोपा स्पर्धेत आतापर्यंत मेसीने १४ गोल केले असून, तो विक्रमापासून तीन गोल दूर आहे.

अर्जेंटिनाने आपल्या स्वातंत्र्यदिना दिवशीच हा विजय मिळवला. अर्जेंटिना संघ सलग १० सामन्यांत अपराजित राहिला आहे. अर्जेंटिनाने आतापर्यंत १५ वेळा ही स्पर्धा जिंकली आहे. या स्पर्धेत विजेतेपद मिळवून अर्जेंटिनाला सलग तीन मोठ्या स्पर्धेची विजेतीपदे मिळविण्याच्या स्पेनच्या कामगिरीशी बरोबरी करण्याची संधी आहे. स्पेनने २००८, २०१२ सलग दोन वेळा युरो आणि दरम्यान २०१० मध्ये विश्वचषक विजेतेपद मिळवले होते. अर्जेंटिनाने २०२१ मध्ये कोपा आणि पाठोपाठ २०२२ मध्ये विश्वचषक स्पर्धेत विजेतेपद पटकावले आहे.

## नोव्हाक जोकोविच उपांत्य फेरीत

**लंडन :** दुखापतीमुळे ॲलेक्स डी मिनाऊरने माघार घेतल्याने सर्बियाच्या दुसऱ्या मानांकित नोव्हाक जोकोविचने विम्बल्डन टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत स्थान मिळवले.

ऑस्ट्रेलियाच्या नवव्या मानांकित मिनाऊरने जोकोविचविरुद्धच्या उपांत्यपूर्व सामन्याच्या काही तासांआधीच स्पर्धेतून माघार घेण्याचा निर्णय घेतला. ‘‘मला जी घोषणा करायची नव्हती तीच मी करत आहे,’’ असे मिनाऊर पत्रकार परिषदेत म्हणाला. जोकोविचने १३व्यांदा विम्बल्डन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत स्थान मिळवले.

## भारताची मालिकेत आघाडी



**हरारे :** कर्णधार शुभमन गिल (४९ चेंडूंत ६६ धावा) व ऋतुराज गायकवाड (२८ चेंडूंत ४९ धावा) यांच्या आक्रमक खेळीनंतर वॉशिंग्टन सुंदरच्या (१५ धावांत ३ बळी) प्रभावी माऱ्याच्या जोरावर भारताने तिसऱ्या ट्वेन्टी-२० सामन्यात झिम्बाब्वेवर २३ धावांनी विजय मिळवला. या विजयानंतर भारताने पाच सामन्यांच्या मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली आहे.

भारताने दिलेल्या १८३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना झिम्बाब्वेची सुरुवात चांगली झाली नाही. त्यांची अवस्था ५ बाद ३९ अशी बिकट झाली होती. मात्र, यानंतर डिऑन मायर्स (नाबाद ६५) आणि क्लाइव्ह मदान्दे (३७) यांनी संघाचा डाव सावरला. मग वेलिंग्टन मसाकाद्झा (नाबाद १८) धावसंख्येत भर घातली. पण, तोवर उशीर झाला होता. त्यामुळे झिम्बाब्वेला २० षटकांत ६ बाद १५९ धावाच करता आल्या. त्यापूर्वी, प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारताला सलामीवीर गिल व यशस्वी जैस्वाल (३६) यांनी चांगली सुरुवात दिली. यानंतर गायकवाडने संघाच्या धावसंख्येत भर घातली व संघाला ४ बाद १८२ धावांपर्यंत पोहोचवले.

## चार सरकारी बँकांकडून केंद्राला ६,४८१ कोटी लाभांश

**पीटीआय, नवी दिल्ली**

**कॅनरा बँक** आणि इंडियन बँकेसह सार्वजनिक क्षेत्रातील चार बँकांनी बुधवारी केंद्राला आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी लाभांशापोटी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना ६,४८१ कोटी रुपयांचा धनादेश सुपूर्द केला. बँक ऑफ बडोदाने २,५१४.२२ कोटी रुपये, कॅनरा बँकेने १,८३८.१५ कोटी रुपये तर चेन्नईस्थित इंडियन बँकेने १,१९३.४५ कोटी रुपयांचा धनादेश दिला. बँक ऑफ इंडियानेदेखील ९३५.४४ कोटी रुपयांचा लाभांश दिला. व्यतिरिक्त, मुंबईस्थित वित्तीय संस्था एक्झिम बँकेने २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी २५२ कोटी रुपयांचा लाभांश दिला.

गेल्या महिन्यात पुण्यात मुख्यालय असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रनेदेखील ८५७ कोटी रुपये लाभांश केंद्राला दिला आहे. सरकारी बँकांकडून सरकारच्या तिजोरीत आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी एकूण १८,००० कोटी रुपयांची भर लाभांशरूपाने पडण्याची आशा आहे.

### निर्देशांक विक्रमी उच्चांकी पातळीपासून माघारी

## नफावसुलीमुळे ‘सेन्सेक्स’ ८० हजारांखाली

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई:** भांडवली बाजारातील प्रमुख निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टी विक्रमी उच्चांकी पातळीपासून माघारी बुधवारी फिरले आणि सत्राअखेर नकारात्मक पातळीवर स्थिरावले. धातू, वाहन निर्मिती आणि माहिती-तंत्रज्ञान कंपन्यांच्या समभागांमध्ये गुंतवणूकदारांनी विक्रीचा मारा केल्याने सेन्सेक्समध्ये चार शतकी घसरण होत तो ८०,००० अंशांखाली बंद झाला. विश्लेषकांच्या मते अमेरिकी मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्हकडून व्याजदर कपातीबद्दल वाढलेल्या अनिश्चिततेमुळे देशांतर्गत बाजारात निराशाजनक वातावरण होते.

दिवसअखेर सेन्सेक्स ४२६.८७ अंशांच्या घसरणीसह ७९,९२४.७७ पातळीवर बंद झाला. दिवसभरात सेन्सेक्सने १२९.७२ अंशांची कमाई करत ८०,४८१.३६ हे सर्वोच्च शिखर गाठले. मात्र ही तेजी दीर्घकाळ टिकू शकली नाही. नफावसुलीमुळे सेन्सेक्समध्ये ९१५.८८ अंशांपर्यंत पडझड झाली दुसरीकडे निफ्टीने



देखील २४,४६१.०५ या विक्रमी पातळीपर्यंत मजल मारली होती. मात्र दिवसअखेर तो १०८.७५ अंशांनी घसरून २४,३२४.४५ पातळीवर स्थिरावला.

देशांतर्गत भांडवली बाजारात तिमाही आर्थिक कमाईच्या हंगामापूर्वी नफावसुलीवर भर दिसून आला. जागतिक अर्थव्यवस्थेतील मंदी आणि उच्च महागाईदरामुळे गुंतवणूकदारांनी समभाग विकण्याला प्राधान्य दिले. याचबरोबर चालू महिन्यात अर्थसंकल्प जाहीर होणार असल्याने त्या पार्श्वभूमीवर गुंतवणूकदारांनी सावध पवित्रा अवलंबिला आहे, असे मत जिओजित फायनान्शियल सर्व्हिसेसचे संशोधन प्रमुख विनोद नायर यांनी व्यक्त केले.

## विश्वेश्वर सहकारी बँकेकडून इंटरनेट बँकिंग सुविधा

**पुणे:** आघाडीची सहकारी बँक असलेल्या दि विश्वेश्वर सहकारी बँकेने ‘व्हीएसबी आयनेट’ या इंटरनेट बँकिंग सुविधेचा शुभारंभ केला. बँकेची पुण्यात सोमवारी ५३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. या वेळी राज्य बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांच्या हस्ते सुविधेचा इंटरनेट बँकिंग सुविधेचा शुभारंभ करण्यात आला. ही सुविधा लवकरच पूर्णपणे कार्यान्वित होणार असून सर्व ग्राहकांना तिचा लाभ घेता येईल.

आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी बँकेच्या संचालक मंडळाने सभासदांना १० टक्के लाभांश देण्यास मान्यता दिली.

बँकेने निर्धारित केलेले उद्दिष्ट पार करत, व्यवसायात २१ टक्के म्हणजेच ६०० कोटींनी वाढ नोंदवली. मार्च २०२४ अखेर बँकेच्या ठेवी २,१३९ कोटी असून, १३४६ कोटींची कर्जे वितरित केली असून, परिणामी तिचा एकूण व्यवसाय ३,४८५ कोटींवर पोहोचला आहे, अशी माहिती बँकेचे अध्यक्ष अनिल गाडवे यांनी दिली.


**इंडियन ओव्हरसीज बँक**
(पत्ता : १सी / ४७-४८, एनआयटी १, फरिदाबाद, फोन नं. : ८९२५९५०१९२ व ईमेल आयडी : iob0192@iob.in)

**सांकेतिक ताबा सूचना**
**(स्थावर मालमत्तेकरिता) [(रुल ८(१)]**

ज्याअर्थी,
**इंडियन ओव्हरसीज बँके**च्या, *फरिदाबाद शाखा, फरिदाबाद,* प्राधिकृत अधकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत वसूलीच्या तारखेपर्यंत संविदात्मक दरातील पुढील व्याज व शिल्लक, आकार, इ. सह २९.०२.२०२४ रोजी प्रमाणे रु. ४,६४,९०,५६७.७० *(रुपये चार कोटी चौसष्ट लाख नव्वद हजार पाचशे सदुसष्ट व पैसे सत्तर फक्त)* असलेल्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याकरिता खालील ऋणको/ गहाणकार/ हमीदार यांच्यावर फर्माविणारी दिनांकित *०१.०३.२०२४* मागणी सूचना निर्गमित केली आहे :-
(१) मेसर्स केएससी कृष्णा स्टिल प्रायव्हेट लिमिटेड (ऋणको), पत्ता : प्लॉट ११९, कृष्णा कॉम्प्लेक्स, धरम कांटा रोड, मुजेस्सर, फरिदाबाद, हरयाणा-१२१००१,
(२) कुसूम सिंघाल (संचालक व हमीदार), पत्ता : एच. नं. ११४, सेक्टर २१ सी, फरिदाबाद, हरयाणा-१२१००१.
(३) नरेश कुमार सिंघाल (संचालक व हमीदार), पत्ता : एच. नं. ११४, सेक्टर २१ सी, फरिदाबाद, हरयाणा-१२१००१ (यापुढे "ऋणको/ हमीदार" म्हणून संदर्भित)
(१) ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, याद्वारा ऋणको तसेच आम जनतेस सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी आज दिनांक ०६ जुलै, २०२४ रोजी उक्त रुल्सच्या रुल ८ यासह वाचलेल्या उक्त ॲक्टच्या सेक्शन १३(४) अंतर्गत त्याला/ तिला प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.
(२) विशेषकरून ऋणको तसेच आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार मागणी सूचना निर्गमित केल्यानंतर, परतफेड केलेली रक्कम वजा करून, जर असल्यास, प्रदानाच्या तारखेपर्यंत मागणी सूचनेमध्ये नमूद केलेल्या पूर्वोक्त तारखेपासून सविदात्मक दरातील त्यावरील पुढील व्याज व मंजूर केल्यानुसार शिल्लक, आकार, इ. सह ०३.०७.२०२४ रोजी प्रमाणे रु. *४,८६,०२,९००.७० (रुपये चार कोटी शहाऐंशी लाख दोन हजार नऊशे व पैसे सत्तर फक्त)* या रकमेकरिता **इंडियन ओव्हरसीज बँके**च्या आकाराच्या विषयाधीन असणार आहे. ताबा घेतल्याच्या तारखेप्रमाणे देय देणी प्रदानाच्या तारखेपर्यंत, संविदात्मक दरातील त्यावरील पुढील व्याज व शिल्लक, आकार, इ. सह देय रु. *४,८६,०२,९००.७० (रुपये चार कोटी शहाऐंशी लाख दोन हजार नऊशे व पैसे सत्तर फक्त)* आहे.
(३) सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता ॲक्टच्या सेक्शन १३ च्या सब-सेक्शन (८) च्या तरतुदींकडे ऋणकोंचे लक्ष वेधीत आहोत.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

*फॅक्टरी जमीन व इमारत येथे स्थित - व्हिलेज - दिंडोरी, तालुका दिंडोरी, जिल्हा नाशिक. मोजमापाचा एरिआ ८००० चौ.मी. मेसर्स केएससी कृष्णा स्टिल प्रा. लि.च्या नावे, विक्री विलेख नं. ३३५१/२०१८ द्वारा, नाशिक - सर्व्हे नं. ०७, गॅट नं. ११/बी.*
सीमा समाविष्ट पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे :
उत्तरेच्या दिशेने - गॅट नं. ११ (पार्ट) द्वारा;
दक्षिणेच्या दिशेने - गॅट नं. १० द्वारा;
पूर्वेच्या दिशेने - गॅट नं. १२ द्वारा;
पश्चिमेच्या दिशेने - रोडद्वारा.
**दिनांकित :** ०६.०७.२०२४ — **स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी**
**स्थळ :** नाशिक — **इंडियन ओव्हरसीज बँक**



सत्यमेव जयते
(Govt. of India Society)
Ministry of Micro, Small & Medium Enterprises
IDEMI
Organised by IDEMI Mumbai
Government Certificate Professional Course On
**Export & import Management**
(FOREIGN TRADE POLICY AND BANKING EXPERTISE)
start your own business.
Course dates-20,21 July 2024 (2 Days) Time: 10.00 am to 5 pm
Venue: IDEMI, Swatantryaveer Tatya Tope Marg, Chunabhatti, Sion, Mumbai
AFTER SUCCESSFUL COMPLETION CERTIFICATE WILL BE ISSUED
Contents: How To Find Overseas Buyers, International Logistics, Foreign Currency Management, Export - Import Procedure & Documentation, Pricing, Government Schemes, Pre shipment & post shipment finance, Letter of credit.
Course fees- 4000/- +18 % GST
in the name of IDEMI, Mumbai (includes lunch & tea)
Scan QR For Registration
For Technical details-8975769272
For whom: Students, Businessman, Exporters & all interested candidates.
Call for Details in between 10 am to 6 pm:
Contact : 9403566219, 9270076724, 8007765693, 9869087617
Documents required : 2 passport photos, Adhar card xerox, Education proof xerox



INDIAN EXPRESS GROUP
**Call For Entries**
HONOURING THE FINEST
DISTRICT MAGISTRATES IN INDIA
NxtGen Infinite Datacenter
Presents
The Indian EXPRESS EXCELLENCE IN GOVERNANCE AWARDS
AWARD CATEGORIES
Innovative Education | Healthcare | Swachhata
Gender & Inclusion | Social Welfare | Agriculture
E - Governance | Skill Development | MSMEs
Start-up & Innovations | Sustainability | Water | Energy
Resource utilisation from Central & State Schemes
JURY AWARDS
Disaster Management | Law & Order | Public Amenities
Jury Special
scan to apply
or visit
eigawards.indianexpress.com
20 July 2024
Last Date For Entries
The Indian EXPRESS — JOURNALISM OF COURAGE
Associate Partner: VAJIRAM & RAVI Institute for IAS Examination
Knowledge Partner: pwc



pnb Housing Finance Limited — Ghar Ki Baat

**परिशिष्ट - IV- अ**
**अचल मालमत्तांची ई-लिलाव विक्री सूचना**
सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, २००२ मधील नियम ८(६) च्या तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

**नोंद.कार्यालय :** नववा मजला, अंतरिक्ष भवन, २२, कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली-११०००१ फोन: ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाईट: www.pnbhousing.com
**नाशिक शाखा :** पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, २०१/२०२, दुसरा मजला, मेट्रो ९९ कमर्शियल कॉम्प्लेक्स, कॉलेज रोड, नासिक, महाराष्ट्र - ४२२००५.

याद्वारे खाली स्तंभ क्र.- अ मध्ये नमूद कर्जदार व जामीनदारांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण/भारग्रस्त असलेल्या खाली स्तंभ-ड मध्ये नमूद अचल मालमत्तेचा मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (पीएनबी एचएफएल)/ सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी रचनात्मक/ प्रत्यक्ष ताबा घेतलेला असून (स्तंभ-क मध्ये नमूद केल्यानुसार) त्यांची ‘जसे आहे जेथे आहे’ आणि ‘तेथे जे काही आहे’ तत्वावर खाली नमूद तपशिलानुसार विक्री करण्यात येईल.
याद्वारे ही सूचना सदर दिनांकास सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, २००२ मधील नियम - ८(६) व ९ अंतर्गत स्तंभ क्र. अ मध्ये नमूद करण्यात आलेल्या कर्जदार/ गहाणदार/ कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अज्ञात), संबंधित कर्जदार/ गहाणदारांच्या (मयत झाले असल्यास) मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक, वारसदार, अभिहस्तांकिती यांना देऊ करण्यात येत आहे. विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया सुरक्षित धनको मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/ सुरक्षित धनकोच्या वेबसाईटला www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.

| कर्ज क्र., कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदार/ कायदेशीर वारसाचे नाव (ए) | मागणी केलेली रक्कम व दिनांक (बी) | ताब्याचा प्रकार (सी) | तारण मालमत्तेचे वर्णन (डी) | आरक्षित किंमत (ई) | बयाणा रक्कम (आ.कि.च्या १०%) (एफ) | बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक (जी) | बोली वृद्धी दर (एच) | पाहणीचा दिनांक व वेळ (आय) | लिलावाचा दिनांक व वेळ (जे) | असल्यास, ज्ञात बोजे/ न्यायालयीन कज्जे (के) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| HOU/NSK/0719/718218, शा.का. नाशिक, मकरंद जगन्नाथ मुरकुटे/ हिराबाई जगन्नाथ मुरकुटे | २६-०६-२०२१ रोजी रु. २४१८७९१.१८ | प्रत्यक्ष ताबा | सदनिका क्र. १०५, दुसरा मजला, प्लॉट क्र. ३४०, स. क्र. ६२/१+ ६२/२+६३+६४, सूर्योदय अपार्टमेंट, आराध्या गार्डन अपा., एबेनेझेर स्कूलसमोर, अशोक युनिव्हर्सल स्कूलजवळ, गंगापूर रोड, चांदशी शिवार, नाशिक, महाराष्ट्र - ४२२००५, भारत. | रु. २२२४००० | रु. २२२४०० | १२-०८-२०२४ | रु. १०,०००/- | ०७.०८.२०२४ रोजी दु. १२.०० ते दु. ४.०० वाजेपर्यंत | १३.०८.२०२४ रोजी दु. १.३० ते ०३.०० वाजेपर्यंत | ज्ञात नाहीत |
| HOU/NSK/0121/849346, शा.का. नाशिक, गायत्री रवींद्र मराठे/ प्रकाश अप्पा सोनावणे | १३-०९-२०२२ रोजी रु. २९०१७७४.३१ | प्रत्यक्ष ताबा | रो हाऊस क्र. १ बी, स्प्लीट १, प्लॉट क्र. १४/बी, स.क्र. २९९/२, हेमपुष्पा रो हाऊस, नवले जल सेवा जवळ, आरके लॉन्स जवळ, स्वराज नगर, दामोदर चौक, पाथर्डी फाटा, नाशिक, महाराष्ट्र - ४२२०१०, भारत | रु. २८०७००० | रु. २८०७०० | १२-०८-२०२४ | रु. १०,०००/- | ०८.०८.२०२४ रोजी दु. १२.०० ते दु. ४.०० वाजेपर्यंत | १३.०८.२०२४ रोजी दु. १.३० ते ०३.०० वाजेपर्यंत | ज्ञात नाहीत |
| HOU/NSK/0919/745714, शा.का. नाशिक, समाधान सुकलाल महाले/ पूनम समाधान महाले | ३१-०३-२०२१ रोजी रु. १०७४०४९.२९ | प्रत्यक्ष ताबा | सदनिका क्र. बीएफ-०४, स.क्र. २५/१बी+२ए/२/१सी, पहिला मजला, आर्या को ऑप. हाऊसिंग सोसायटी लि., नाशिक, अरुण पवार यांच्या बंगल्याशेजारी, जुईनगर, किशोर सूर्यवंशी नगर, पेठ रोड, नाशिक, महाराष्ट्र - ४२२००३, भारत. | रु. १०६२००० | रु. १०६२०० | २५-०७-२०२४ | रु. १०,०००/- | १६.०७.२०२४ रोजी दु. १२.०० ते दु. ४.०० वाजेपर्यंत | २६.०७.२०२४ रोजी दु. १.३० ते ०३.०० वाजेपर्यंत | ज्ञात नाहीत |
| HOU/NSK/0219/656023, शा.का. नाशिक, अश्फाक उस्मान नदफ/ सबिहा अश्फाक नदफ | २६-०६-२०२१ रोजी रु. १५९२४८५ | प्रत्यक्ष ताबा | सदनिका क्र. १२, दुसरा मजला, प्लॉट क्र. २४, स.क्र. २४१/१सी+ १ए/१-१/२-१, खुशाली विहार, बजाज शोरूमच्या मागे, दिंडोरी रोड, म्हसरूळ, नाशिक, महाराष्ट्र - ४२२००४, भारत. | रु. ८१०००० | रु. ८१००० | २५-०७-२०२४ | रु. १०,०००/- | २२.०७.२०२४ रोजी दु. १२.०० ते दु. ४.०० वाजेपर्यंत | २६.०७.२०२४ रोजी दु. १.३० ते ०३.०० वाजेपर्यंत | ज्ञात नाहीत |
| NHL/NSK/0319/658772, शा.का. नाशिक, आडगावकर सिल्क अँड सारीज प्रा.लि./ महेश राम आडगावकर/ गोकुळ शाम आडगावकर/ लव राम आडगावकर/ रेखा राम आडगावकर/ सुनिता शाम आडगावकर/ लक्ष्मीबाई शशिकांत आडगावकर/ कुश राम आडगावकर/ राम शशिकांत आडगावकर/ शाम शशिकांत आडगावकर | २२-०१-२०२२ रोजी रु. १२२४२४५९२.६२ | प्रत्यक्ष ताबा | व्यावसायिक शोरूम, तळ मजला, पहिला मजला, दुसरा मजला व तिसऱ्या मजल्यावरील ऑफिस परिसर, प्लॉट क्र. ४०, स. क्र. ६५६ १ १ बी४३, फायनल प्लॉट क्र. ३८७डी टीपीएस क्र. २, राजीव गांधी भवन जवळ, शरणपूर लिंक रोडच्या पलिकडे, नाशिक, महाराष्ट्र - ४२२००२, भारत. | रु. ९०००००० | रु. ९००००० | २५-०७-२०२४ | रु. १०,०००/- | २४.०७.२०२४ रोजी दु. १२.०० ते दु. ४.०० वाजेपर्यंत | २६.०७.२०२४ रोजी दु. १.३० ते ०३.०० वाजेपर्यंत | ज्ञात नाहीत |

*सोबत भरण्याच्या व/ वा वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू असेल त्यानुसार वार्षिक १८% दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, शुल्के, अधिभार इ. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार वर स्तंभ के मध्ये जाहीर केलेल्या माहितीशिवाय वर नमूद अचल/ अनामत मत्तांच्या संदर्भात इतर कोणतेही बोजे/दावे नाहीत. याशिवाय असे कुठलेही बोजे असल्यास यशस्वी खरेदीदाराने/ बोलीदाराने ते स्वतः भरावयाचे आहेत. संभाव्य खरेदीदार/बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी वर नमूद बोजांची स्वतंत्रपणे चौकशी करावी.
१. आज दिनांकास वर नमूद अचल मालमत्ता/अनामत मत्तांची विक्री करणे, त्यांची विल्हेवाट लावणे इ. पासून पीएनबीएचएफएल/ पीएनबीएचएफएलच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांना प्रतिबंध करणारा कोर्टाचा कोणताही हुकुम नाही.
२. संभाव्य खरेदीदारांनी/ बोलीदारांनी आणि इच्छुकांनी स्तंभ-के मध्ये नमूद केलेल्या प्रक्रिया/आदेश इ. मधील बाजूची स्वतंत्रपणे चौकशी करावी. यात पीएनबीएचएफएल यांचेकडे उपलब्ध असलेल्या दस्तावेजांच्या मालकी हक्काचा समावेश आहे, परंतु ते तेथपर्यंतच मर्यादित नसून त्यांनी निविदा/ बोली अर्ज सादर करण्याअगोदर किंवा प्रस्ताव देण्याअगोदर सर्व बाबतीत चौकशी करून घ्यावी. बोलीदारास बोली प्रपत्रासोबत सदर लिलावाच्या अटी व शर्तींवर स्वाक्षरी करावी लागेल.
३. कृपया लक्षात घ्यावे की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, २००२ मधील नियम ९(३) च्या अनुषंगाने बोलीदार/खरेदीदार विक्री किमतीच्या २५% एवढी रक्कम (जमा केलेली बयाणा रक्कम धरून) त्याच दिवशी किंवा फार तर पुढील कामकाजाच्या दिवशी सादर करण्यास बांधील आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, २००२ मधील नियम ९(२) नुसार सुरक्षित धनकोस विक्री किमतीच्या २५% एवढी रक्कम प्राप्त झाल्यावरच विक्री बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री रकमेपैकी उर्वरित ७५% रक्कम खरेदीदारास विक्रीच्या निश्चितीच्या पावतीच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत जमा करावी लागेल, अन्यथा मालमत्ता/अनामत मत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल.
४. मे. सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, कॉर्पोरेट कार्यालय, प्लॉट क्र. ६८, तिसरा मजला, सेक्टर ४४, गुडगाव, हरयाणा १२२००३ वेबसाईट - www.bankeauctions.com हे प्राधिकृत अधिकाऱ्यांना ई-लिलावाच्या माध्यमातून विक्रीची प्रक्रिया राबविण्यास मदत करतील. मालमत्तेच्या पाहणीशी किंवा बोली दस्तावेज प्राप्त करण्याशी संबंधित कोणत्याही मदतीसाठी आणि कोणत्याही चौकशीसाठी किंवा नोंदणीसाठी आपण पीएनबीएचएफएलचे प्राधिकृत अधिकारी श्री. विवेक लोढ संपर्क क्रमांक १८००१२०८८००, www.pnbhousing.com वर भेट द्यावी किंवा www.auction@pnbhousing.com पाहावे.

स्थान: नाशिक दिनांक: ११.०७.२०२४ — प्राधिकृत अधिकारी, मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड


हे पत्र वैदेही ठकार यांनी मालक द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, प्लॉट नं. ईएल-२०८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१० येथे छापून मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१ येथे प्रसिद्ध केले. **लोकसत्ता कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७.
**महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५ /२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४. दूरध्वनी : ०२०-६७२४१०००. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. नं. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७.
■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : सिद्धार्थ खांडेकर*** (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) R. N. I. Reg. No. 1591/57 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई. ■ कोलकाता, दिल्लीसाठी प्रत्येकी १० रुपये.